


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २९ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मांजरा तील पाण्याला मृतसाठ्याची ओढ
# फक्त ७ टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक



**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

तीन महिने करावा लागणार पाणी टंचाईचा सामना बीड-लातुर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात आज २८ मार्च अखेर पर्यंत फक्त ७ टक्केच जिवंत पाणी साठा शिल्लक असून येत्या काही दिवसांत हा जिवंत पाणीसाठा संपून मृत भांड्यातील पाण्यावर या शेकडो गावातील लोकांना अवलंबून रहावे लागणार आहे बीड जिल्ह्यासह संपुर्ण मराठवाड्यात यावर्षी अल्प पावूस झाला असल्यामुळे मराठवाडा विभागातील अनेक मोठी धरणे यावर्षी भरली नव्हती. त्यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार हे गृहीत ठरलेलेच होते यावर्षी बीड लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात पावसाळा संपण्यापूर्वी जेमतेम पाणी साठा जमा झाला होता. धरणातील पाण्याचा सततचा मोठ्या प्रमाणावर होणा-या उपसा मुळे बघता बघता धरण मृत साठ्याच्या पाणी पातळीपर्यंत येवून पोहंचला आहे. आज २९ मार्च अखेर धरणात फक्त ७.९४ टक्के एवढाच पाणीसाठा शिल्लक असल्याची अधिकृत माहिती आहे. मांजरा धरणाच्या पाणीपातळी कडे दररोज लक्ष ठेवून असलेल्या लातुर पाटबंधारे उपविभाग क्रमांक १ कार्यालयातील शाखा अभियंता सुरज निकम यांनी दिलेल्या अधिकृत माहिती नुसार २२४.०९३ एमसीयुएम पाणी साठवण क्षमता असलेल्या मांजरा धरणात फक्त ६१.१७४ एमसीयुएम एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरणात फक्त १४.०४४ एमयुसीएम एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरण क्षेत्रात सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर जाणवत असल्यामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण ही वाढले आहे. सध्या हे प्रमाण ७.२ एमएम एवढे आहे. मांजरा धरणातील आजचा पाणीसाठा लक्षात घेता येत्या काही दिवसांत एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मांजरा धरणातील पाण्याची पातळी ही शुन्य साठ्या पर्यंत जाईल. म्हणजे एप्रिल महिना, मे आणि जून महिना पूर्ण अशी तीन महिने या तीन जिल्ह्यातील शेकडो गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे प्रशासन निवडणुकीच्या तयारीत मग्न मांजरा धरणातील पाणी शुन्य पातळी कडे पोहोचत असलेतरी पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत जाणवणा-या संभाव्य पाणी टंचाई चार मुकाबला कसा करावा यासाठी प्रशासनाने अद्याप काही हालचाली सुरु केल्या असल्याचे दिसून येत नाही. सध्या संपूर्ण प्रशासन हे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुर्ण वेळ कार्यरत असल्याचे दिसून येते आहे.

## लोकसभा निवडणूक

## प्रणिती शिंदे यांचं राम सातपुतेंना आव्हान



सोलापुरात शिवसेना ठाकरे गटाचा पदाधिकारी मेळावा पार पडला. या मेळाव्याला काँग्रेसच्या लोकसभा उमेदवार प्रणिती शिंदे उपस्थित होत्या. प्रणिती शिंदे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. तेव्हा भाजपवर त्यांनी जोरदार टीका केली. भाजपने 10 वर्षे सोलापुरकरांचा विश्वासघात केला. पण तरीही भाजपने लोकांचा विश्वासघात केला. काँग्रेसकडे आक्रमकता नव्हती. पण शिवसेना आमच्यासोबत आली आहे. आपल्याला भाजपच्या विरोधात लढायचं आहे. त्यांच्या विचारधारेविरोधात लढायचं आहे,

## निगेटिव्ह सर्व्हेच्या नावाखाली जागांवर डल्ला? भाजपविरोधात शिंदे गटात धुसफूस



राज्यात जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. त्यासाठी दोन्ही पक्षांसोबत जागा वाटपही सुरू केलं आहे. हे जागा वाटप सुरू असतानाच निगेटिव्ह सर्व्हेच्या नावाखाली भाजपने शिंदे गटाच्या जागा बळकावण्याचं सत्र सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे शिंदे गटात भाजपविरोधात प्रचंड नाराजी पसरली आहे. ज्या कारणांमुळे उद्धव ठाकरेंची साथ सोडली, त्याच्या उलट कृती महायुतीत व्हायला लागली आहे. आमचे मतदारसंघ धोक्यात आले आहेत, अशी भावना शिंदे गटाच्या खासदारांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे शिंदे गट आणि भाजपमधील अंतर्गत कलह वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## हात जोडून विनंती करते की: नवनीत राणा यांचं आवाहन?



भाजपने अमरावतीमधून नवनीत राणा यांची उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ आणि आमदार बच्चू कडू यांनी विरोध केला आहे. नवनीत राणा यांना पाडण्यासाठी काम करणार असल्याचं बच्चू कडू म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर नवनीत राणा यांनी भाष्य केलं आहे. राणा यांनी अडसूळ आणि बच्चू कडू यांना एकत्र येण्याचं आवाहन केलं आहे. आजपर्यंत कधीही अमरावतीमध्ये कमळ फुललं नाही. यावेळी कमळ फुललं पाहिजे, असं अमरावतीकरांची इच्छा होती. आमची इच्छा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केला, असं नवनीत राणा म्हणाल्या.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर दोन हजार किलो द्राक्षांनी सजले

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**



पुणे: श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर रविवारी होळीच्या पूर्वसंध्येला दोन हजार किलो द्राक्षांनी सजवण्यात आले. मंदिराची सजावट पाहण्यासाठी पुण्यातील लोकांनी मोठी गर्दी केली होती. नाशिकमधील सह्याद्रीच्या शेतकऱ्यांनी पिकवलेली २००० किलोग्रॅमहून अधिक निर्यातक्षम आणि रसायनमुक्त द्राक्षे सजावटीसाठी वापरली गेली आहेत. द्राक्ष महोत्सव, दरवर्षी मंदिरात आयोजित केलेला एक अनोखा आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध कार्यक्रम आहे. सजावटीमुळे भाविकांना नयनरम्य दृश्य निर्माण होते. ही द्राक्षे नंतर भाविक, अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि ससून हॉस्पिटलमध्ये प्रसाद म्हणून वाटली जातील. तिसऱ्या वर्षी मंदिरात अशा प्रकारची सजावट करण्यात आली होती. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर हे पुणे शहरातील अभिमानाचे आणि सन्मानाचे प्रतीक आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक श्रीगणेशाची पूजा करण्यासाठी येथे येतात. श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिर हे देशातील सर्वात पूजनीय स्थळांपैकी एक नाही तर श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या माध्यमातून सामाजिक कल्याण आणि सांस्कृतिक विकासात सक्रियपणे गुंतलेली संस्था आहे..

## अभिनेता भरत जाधव यांना पहिला भरतरत्न पुरस्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/पंकज भंडारी**



ज्येष्ठ रंगकर्मी अशोक मुळ्येंच्या संकल्पनेतून पार पडणारा 'माझा पुरस्कार' सोहळा येत्या १ एप्रिलला दादरच्या श्री शिवाजी मंदिरमध्ये सायंकाळी ७.३० वाजता होणार आहे. पुरस्काराचे हे १६ वे वर्ष आहे.या वेळी अभिनेता भरत जाधव यांना 'पहिला भरतरत्न' पुरस्कार देण्यात येईल. नाटय़ शास्त्राचे प्रणेते भरतमुनी यांच्या योगदानाचा गौरव म्हणून या वर्षीपासून 'भरतरत्न' पुरस्कार देण्यात येणार आहे.याशिवाय सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता – वैभव मांगले ('मर्डरवाले कुलकर्णी'), सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री – भार्गवी चिरमुले ('मर्डरवाले कुलकर्णी'), विशेष लक्षवेधी भूमिका – आदिती सारंगधर ('मास्टर माइंड'), नाटय़ लेखनासाठी स्वप्नील जाधव ('अस्तित्व'), दिग्दर्शनासाठी रणजित पाटील ('जर तरची गोष्ट'), सर्वोत्कृष्ट अभिनेता – संकर्षण कऱ्हाडे ('नियम व अटी लागू'), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री – गौतमी देशपांडे ('गालिब'), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता – आशुतोष गोखले ('जर तरची गोष्ट'), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री – सलोनी सुर्वे ('अस्तित्व') यांनाही पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे.

## इंदिरा देणार विमान सेवा प्रशिक्षणार्थींना आंतरराष्ट्रीय दर्जाचे परिपूर्ण प्रशिक्षण

### आकाशात झेपावू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पंखांना देणार बळ

**वादळवार्ता/पुणे**

भारतीय हवाई क्षेत्रात येत्या दोन वर्षात हजारो विमानांचा ताफा दाखल होतं असून लाखो नोकऱ्यांची संधीही उपलब्ध झाली आहे. त्या अनुषंगाने इंदिरा संस्थेने पुढचे पाऊल टाकत उंच आकाशी झेप घेण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देत नोकऱ्या देणार असल्याचे प्रतिपादन इंदिरा शिक्षण समुहाच्या अध्यक्षा डॉ. तरिता शंकर यांनी ताथवडे येथे केले.

श्री चाणक्य एज्यूकेशन सोसायटीच्या इंदिरा शिक्षण समूहाने इंदिरा स्कुल ऑफ एव्हिएशन हे हवाई क्षेत्रातील जागतिक दर्जाचे विविध प्रोफेशनल घडविणारे महाविदियालय सुरु केल्याची माहिती डॉ. तरिता शंकर यांनी बुधवारी (ता. २७) पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंडीत माळी, इंदिरा स्कुल ऑफ एव्हीएशनच्या संचालिका नीतू रोशा, अभय अहिरे, रिचा मल्होत्रा उपस्थित होते. डॉ. तरीता शंकर पुढे म्हणाल्या, आताच्या हवाई क्षेत्राचा दृष्टीनकोन खूप बदलला आहे. या क्षेत्राशी माझं भावनिक नातं आहे.

देशभरात विमानतळांची संख्या वाढत आहे. तसे मनुष्यबळाची मागणी वाढणार आहे त्यादृष्टीने कुशल मनुष्यबळ आम्ही इंडस्ट्रीला देणार आहोत असे ही त्या म्हणाल्या. माळी यांनी इंदिरा संस्थेच्या आजवरच्या यशस्वी शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत संस्था आता हवाई क्षेत्रात पदार्पण करत असल्याचे नमूद केले. संस्थेने अनेक हवाई सेवा देणाऱ्या कंपन्यांसोबत करार केले असून ही संख्या वाढणार आहे. ग्राउंड स्टाफ पासून ते पायलट प्रशिक्षणापर्यंत सर्व अभ्यासक्रम यामाध्यमातून आम्ही देणार आहोत.' असे रोशा यांनी सांगितले.




# ठीक ठिकाणच्या तोफांच्या सलामीत माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत
# माजलगाव दौऱ्यानिमित्त कार्यकर्त्यांचा उत्साह

**बीड/प्रतिनिधी**

सध्या लोकसभा निवडणुकीचे वातावरण असतानाच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आज माजलगाव येथील एका कार्यक्रमानिमित्त दौरा आयोजित केला होता या दौऱ्यानिमित्त जात असताना जवळपास २० गावांमधून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. आजूबाजूच्या वाड्या वस्त्यांमधील लोकही रस्त्यावर येऊन थांबलेले दिसले यावेळी कार्यकर्त्यांचा उत्साह बघण्यासारखा होता प्रचंड प्रमाणात घोषणाबाजी आणि क्षीरसागरांना आम्ही तुमच्याबरोबरच असल्याचा विश्वास प्रत्येक कार्यकर्ता देत होता,तुम्ही बांधाल ते तोरण आणि तुम्ही ठरवताल ते धोरण म्हणत कार्यकर्त्यांनी संवाद साधला. आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे माजलगाव दौऱ्यावर जात असताना मोची पिंपळगाव,घोडका राजुरी,काठोडा, भवानवाडी,कुटेवाडी,वांगी,वायभटवाडी, शिवणी, जरूड,मैंदा,पोखरी, बाभुळखुंटा,मौंजवाडी, मौंज, ब्रम्हगांव,ढेकनमोहा, ढेकनमोहा तांडा, घाटसावळी,घाटसावळी तांडा,बक्करवाडी, कारळवाडी, निर्मळवाडी, मन्यारवाडी, मानकुरवाडी, आंबेसावळी, वलीपूर,घाटजवळा इत्यादी गावातील ग्रामस्थांनी ठीकठिकाणी स्वागत केले.काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघातील काही गावांचा डोंगरी विभागात सहभाग करून घेण्यासाठी माजीमंत्री क्षीरसागर यांनी प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नातून ज्या गावचा समावेश झाला त्या गावच्या गावकऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आज त्यांचे स्वागत केले यावेळी बीड तालुका, माजलगाव तालुका,वडवणी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# बजरंग सोनवणेकडून आत्महत्या ग्रस्त कुटुंबियाचे सांत्वन



वादळवार्ता/बीड
आष्टी तालुक्यातील शेरी (बु.) येथील प्रवीण सोनवणे या युवकाने मराठा आरक्षणासाठी स्वतःचे जीवन संपविले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभेचे संभाव्य उमेदवार शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांनी मयत प्रवीण सोनवणे यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करीत धीर दिला. यावेळी साहेबराव दरेकर, नाना हंबर्डे, परमेश्वर शेळके, डॉ. संतोष जाधव हे उपस्थित होते.

# कळंब येथील आडत व्यापाऱ्याची मुलगी झाली कनिष्ठ अभियंता




वादळवार्ता/कळंब
धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील अडत व्यापारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे यांची कन्या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या सरळ सेवा परीक्षेमध्ये परीक्षा देऊन धाराशिव जिल्हा परिषद च्या कनिष्ठ अभियंता म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल कुमारी अश्विनी सुरेश साळवे हीचे सर्वत्र कौतुक आणि स्वागत होत आहे
कळंब येथील व्यापारी पेठेतील प्रसिद्ध आडत व्यापारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेश चंद्रकांत साळवे यांची मुलगी कु अश्विनी सुरेश साळवे हिने नुकतीच दिलेल्या सरळ सेवा परीक्षेमध्ये धाराशिव जिल्हा परिषद च्या श्रेणी दोन कनिष्ठ अभियंता पदी नुकतीच निवड झाल्याने तिचे सर्वत्र स्वागत होत आहे शिरूर कासार येथील पार्श्वभूमीचे तालुका प्रतिनिधी अशोक भांडेकर यांचे सुरेश साळवे हे मेव्हणे आहेत या कु अश्विनीचा सत्कार प्रसंगी सौ भांडेकर श्री व सौ साळवे उपस्थित होते

# बीड लोकसभेसाठी बाबासाहेब लंबाटे तिसऱ्या आघाडीचे उमेदवार




वादळवार्ता/पाटोदा
२१ घटक पक्ष मिळून तिसरी राजकीय आघाडीची दि.२३ मार्च २०२४ रोजी मुंबई येथे मुख्य संयोजक संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद संपन्न होऊन त्यामध्ये लोकसभा २०२४ च्या निवडणुकीसाठी तिसऱ्या आघाडीच्या २१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडी महाराष्ट्र राज्याचे दोन उमेदवार घोषित केले. त्यामध्ये बीड लोकसभेसाठी राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडीचे संस्थापक बाबासाहेब लंबाटे व परभणी लोकसभेसाठी सखाराम ग्यानबा बोबडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बाबासाहेब लंबाटे यांनी बीड लोकसभा मतदार संघातील वाडी-वस्ती व गावांमध्ये संपर्क दौरे सुरू केले असून मतदारांच्या भेटी घेऊन मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत.

# संत एकनाथ महाराज दर्शन सोहळा!

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज महाराष्ट्रातील महत्त्वाचे संत होत. त्यांचे जन्मस्थान गोदावरी काठावरील औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण होय. संत एकनाथ महाराज स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस आणि पुण्यतिथी षष्ठीलाच साजरी करत. पारंपरिक मराठी पंचांग, दिनदर्शिकेप्रमाणे फाल्गुन महिन्यातील वद्य पक्षातील षष्ठीच्या दिवशी श्री एकनाथ षष्ठी साजरी केली जाते. या दिवशी श्री एकनाथ महाराजांनी जलसमाधी घेतली, असे मानले जाते. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीची पहिली अस्सल शुद्ध आवृत्ती लोकांपुढे आणण्याचे श्रेय संत एकनाथ महाराजांना दिले जाते. एकनाथी भागवतातील १८ हजार ८०० ओव्यांच्या माध्यमातून श्रीमद् भागवत पुराणाच्या स्कंदावर त्यांनी भाष्य केले. संत एकनाथ महाराजांनी सामान्यांना भक्तीचा मार्ग ज्ञानाच्या मार्गापेक्षा सोपा आहे, मोक्षासाठी तो पुरेसा असल्याचे सांगितलेले आहे.

श्री एकनाथ महाराजांच्या घराण्याचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. संत एकनाथ महाराजांना नाथही संबोधतात. नाथांचे पणजोबा श्री संत भानुदास महाराजांनी कर्नाटकात श्रीकृष्णदेवरायाने नेलेली श्री विठुरायाची मूर्ती पंढरीत परत आणली, हा इतिहास आहे. पुढे त्यांनी पंढरपुरात सोळखांबी येथे समाधी घेतली. सोळखांबीतून पांडुरंगाच्या गाभाऱ्यात जाताना उजव्या हाताची पहिली संत भानुदास महाराजांची समाधी आहे. ज्या ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचा पाया म्हटला जातो, त्या ज्ञानेश्वरांची समाधी २५० वर्षानंतर लोकांच्या विस्मरणात गेली. परंतु नाथांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा शोध लावला. समाधीचा चौथरा आणि गाभारा नाथांनी बांधला. आळंदीची वारी पुन्हा सुरु केली. ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथांची लेखणी लोकोद्धारासाठीच झिजली, तळमळली, तळपली होती, असे श्री. एकनाथपदाश्रित योगिराज महाराज गोसावी-पैठणकर आपल्या एका लेखात नमूद करतात.


संत एकनाथ महाराज युगप्रवर्तक होते. त्यांनी भारुड, अभंगाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मुलन, जातीयतेच्या विरोधात कार्य केले. कृतीतून दाखवूनही दिले. डोळस कृतीशील समाज निर्मितीसाठी प्रयत्न केले. संत कवींनी संपन्न केलेल्या भारुड रचनेच्या शैलीला संत एकनाथ महाराजांनी भाषा समृद्धी दिली. अमृताहूनी गोड अशा मराठी भाषेला लोकभाषा बनविली. त्याचबरोबर हिंदी भाषेतही त्यांनी रचना केल्या. भागवत धर्मप्रसाराच्या हेतूने त्यांनी हिंदी भाषेचा कौशल्यपूर्णरित्या वापर करुन भारुडातून रुढी परंपरांवर प्रहार केले आहेत. दोनशेपक्षा जास्त पदे त्यांनी हिंदीतून लिहिली आहेत. संत एकनाथ महाराजांचे अनेक पैलू आहेत. समकालिनांना ते आदर्श आहेत, तसेच आधुनिकांनाही. संत एकनाथांनी ब्रम्हविद्येचा सुकाळ होता त्यावेळी सामान्यांच्या कल्याणासाठी ग्रंथसंपदा निर्मित केली. इतर संतांपेक्षाही ती अधिक अशीच आहे. त्यात विविधता आहे. यामध्ये चतु:श्लोकी भागवत, भावार्थ रामायण, रक्मिणी स्वयंवर, एकादश स्कंदावरील टीका हे मुख्य ग्रंथ आहेत. तर हस्तामलक, स्वात्मसुख, शुकाष्टक, आनंदलहरी, चिरंजीवपद यासारखी स्फुट आध्यात्मिक प्रकरणे, काही पौराणिक आख्याने व संत चरित्रे आणि असंख्य अभंग व भारुडे आहेत. संत ज्ञानेश्वर लिखित ज्ञानेश्वरीचेही पहिल्यांदा शुद्धीकरण करुन ती शुद्ध प्रत लोकांना दिली. त्यामुळे त्यांना मराठी भाषेचे पहिले संपादक होण्याचा मान मिळतो. त्यांच्या या प्रचंड वाङ्मयाने केलेले लोकविलक्षण कार्य पाहून संत एकनाथ महाराज हेच महाराष्ट्राचे खरे नाथ आहेत, असे ज्ञानेश्वर महाराज जळगावकर डॉ. कुमुद गोसावी यांच्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात म्हणतात. जे की तंतोतंत खरे आहे.

संत एकनाथांचा जन्म १५३३ मध्ये पैठण येथे झाला. एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दन स्वामी यांना आपले गुरू मानले. त्यांच्याकडूनच एकनाथांनी वेदांत, योग, भक्तियोग यांचे शिक्षण घेतले. बराचसा काळ ध्यान आणि वेदाध्ययनात घालवला. गुरुंबरोबर तीर्थयात्रा केल्यानंतर त्यांनी गुरुंच्या आज्ञेनुसार गृहस्थाश्रम स्वीकारला. नाथांनी परिश्रम करून गुरुसेवा केली आणि साक्षात दत्तात्रेयांनी त्यांना दर्शन दिले. द्वारपाल म्हणून ते नाथांच्या द्वारी उभे असत, असे सांगितले जाते. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त, देवीभक्तही होते. मराठवाडा संतांची भूमी. त्या संतांच्या भूमीतील संत एकनाथांनी लोकोद्धाराचे महनीय, अतुलनीय असेच कार्य केलेले आहे नव्हे तर कृतीतून त्यांनी करुन दाखविले आहे. आधी केले मग सांगितले या उक्तीला आयुष्यभर महत्त्व देऊन प्राणीमात्रांबरोबर, सामान्यांतही देव त्यांनी शोधला. गुरु जनार्धन स्वामींकडून योगशास्त्राचे धडे घेतले. त्यांच्या आग्रहानुसारच गृहास्थाश्रमही स्वीकारले. भारत भ्रमणानंतर जीवनभर नाथांनी लोकप्रबोधनाचे कार्य केले. भक्तीची वाट दाखवली. जातीभेद, कर्मकांडाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. संत ज्ञानेश्वरांचे अपूर्ण राहिलेले कार्य त्यांनी पुढे नेऊन वारकरी संप्रदायाची पताका त्यांनी तेजाने तळपत ठेवली. कीर्तन, भारुडातून समतेची शिकवण दिली आहे. त्यांच्या या शिकवणीतून आपणही प्राणीमात्रांवर दयेचा, मानव कल्याणचा संकल्प करुयात, त्यांचा संदेश दूरपर्यंत पसरुया. भाविकांच्या या श्रीनाथ षष्ठी सोहळ्यासाठी व सोहळ्याच्या प्रवासासाठी शुभेच्छा देऊन शांती ब्रम्ह संत श्री एकनाथांच्या चरणी नतमस्तक होऊया! नाथांचे पणजोबा श्री संत भानुदास महाराजांनी कर्नाटकात श्रीकृष्णदेवरायाने नेलेली श्री विठुरायाची मूर्ती पंढरीत परत आणली, हा इतिहास आहे. संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचा पाया म्हटले जाते, त्या ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर सुमारे २५० वर्षानंतर नाथांचा जन्म झाला आणि त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. ज्ञानेश्वरांची विस्मृतीत गेलेली ज्ञानेश्वर महाराजांची समाधी एकनाथांनी शोधून काढली आणि समाधीचा चौथरा आणि गाभारा बांधला. आळंदीची वारी पुन्हा सुरू केली.

फाल्गुन वद्य षष्ठीला संत एकनाथ समाधीस्त झाले. म्हणूनच फाल्गुन महिन्याच्या वद्य षष्ठीला एकनाथ षष्ठी असे संबोधले जाते. या दिवशी पाच घटना घडल्याने त्यांना पंचपर्वश्रेणी असं म्हणतात. नाथ स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस व पुण्यतिथी म्हणून यादिवशी उत्सव साजरा करीत. पुढे नाथांनीही याच दिवशी जलसमाधी घेतल्याने श्री एकनाथ षष्ठी म्हणून पुढे हा दिवस साजरा करण्यात येवू लागला. नाथषष्ठीला देखील यात्रा भरते. काल्याचे किर्तन केले जाते. अनेक ठिकाणा वरून दिंड्या आलेल्या असतात. नाथांच्या पादूकांची पालखी काढली जाते. पादूकांना गोदास्नान घालण्यात येते. मंदिराच्या समोरील पटांगणावर टाळमृदुंगाच्या गजरात शेकडो भाविक पावल्या खेळण्यात तल्लिन होऊन जातात. मंदिराच्या बाजूस उंच ठिकाणी गुळ आणि लाह्या यांचे मोठेमोठे लाडू आकर्षकरित्या बांधण्यात येतात. औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणमधील नाथ षष्ठी सोहळा म्हणजे महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची यात्रा होय. पंढरपूर यात्रेखालोखाल लाखोंच्या संख्येने भाविक येथे येतात. सप्तमी, अष्टमीला मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होतो. मुख्य पालखीसोबत अंदाजे ६०० दिंड्या राज्यभरातून येथे येतात. यामध्ये जवळपास ४ लाखांपेक्षा अधिक भाविक श्री एकनाथ महाराजांच्या दर्शनाला महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरुन येतात. काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होते. दरवर्षी यात्रेचे सुनियोजन प्रशासनामार्फत केले जाते. !! एकनाथ षष्ठीच्या पावनपर्वावर संतश्रेष्ठ एकनाथजी महाराजांच्या चरणी शतशः विनम्र अभिवादन !!

# शिंदेंच्या शिवसेनेकडून उमेदवारांची यादी जाहीर, कुणाकुणाला संधी?.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत एकूण 8 उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. मावळमधून श्रीरंग बारणे, रामटेकमधून राजू पारवे, हातकणंगलेमधून धैर्यशील माने, कोल्हापूरमधून संजय मंडलिक, हिंगोलीतून हेमंत पाटील, बुलडाणातून प्रतापराव जाधव, शिर्डीत सदाशिव लोखंडे,



शिवसेना मध्यवर्ती कार्यालय
कार्यालय : आनंदआश्रम, श्री भवानी चौक, टेंभी नाका, ठाणे (प.) - १.
दुरध्वनी : २५३४६६५५ फॅक्स : २५३३ ६१०९

प्रसिध्दी साठी -

हिंदूहृदयसम्राट वंदनीय **शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे** यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते **श्री एकनाथ शिंदे** यांच्या आदेशानुसार लोकसभा निवडणूक २०२४ साठी शिवसेना पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची पहिली यादी खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे -

| | मतदार संघ | उमेदवार |
|---|---|---|
| १ | ३० - मुंबई दक्षिण मध्य | श्री राहुल शेवाळे |
| २ | ४७ - कोल्हापुर | श्री संजय मंडलीक |
| ३ | ३८ - शिर्डी (अजा) | श्री सदाशिव लोखंडे |
| ४ | ५ - बुलढाणा | श्री प्रतापराव जाधव |
| ५ | १५ - हिंगोली | श्री हेमंत पाटील |
| ६ | ३३ - मावळ | श्री श्रीरंग बारणे |
| ७ | ९ -रामटेक (अजा) | श्री राजू पारवे |
| ८ | ४८ -हातकणंगले | श्री धैर्यशिल माने |

शिवसेना
संजय मोरे
सचिव, शिवसेना

Email : info@shivsenacentraloffice.com

दक्षिण मुंबईतून राहुल शेवाळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत खासदार श्रीकांत शिंदे, नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांचं नाव नाही. या दोन्ही मतदारसंघांवर भाजपचा दावा सांगितला जात होता. गेल्या अनेक दिवसांपासून या मतदारसंघांबाबत चर्चा सुरु होती. शिवसेनेकडून देखील या मतदारसंघावर दावा सांगितला जात होता. का शि कोण कुणाच्या विरोधात लढणार?
शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांची यादी समोर आल्यामुळे आता 8 मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी विरुद्ध महायुतीत कोण कुणाच्या विरोधात लढणार ते स्पष्ट झालं आहे. दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघात आता ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई आणि शिंदे गटाचे राहुल शेवाळे यांच्या लढत निश्चित झाली आहे. शिंदे गटाकडून शिर्डी लोकसभा मतदारसंघात सदाशिव लोखंडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तर ठाकरे गटाकडून भाऊसाहेब वाकचौरे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे शिंदे आणि ठाकरे गटाचे दोन उमेदवार इथे समारोसमोर निवडणुकीच्या रणांगणात बघायला मिळणार आहेत. वसेनेच्या प्रसिद्धीपत्रात ठाण्याच्या कार्यालयाचा पत्ताशिवसेना मध्यवर्ती कार्यालयाकडून एक प्रसिद्धीपत्रक जारी करत लोकसभा निवडणुकीसाठी 8 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या प्रसिद्धीपत्रकात ठाण्याच्या आनंदआश्रमचा पत्ता आहे. याचाच अर्थ शिंदेंच्या शिवसेनेच्या ठाण्याच्या आनंदआश्रम कार्यालयाला आता जास्त महत्त्व असणार आहे. ठाकरे गटाच्या दादरमधील शिवसेना भवनाला महत्त्व आहे. तसं आता शिंदेंच्या शिवसेनेच्या ठाण्यातील आनंदआश्रम कार्यालयात आता महत्त्व असल्याचं पाहायला मिळत आहे. शिंदेंच्या शिवसेनेचं मुंबईतील नरिमन पॉईंट येथे देखील बाळासाहेब भवन म्हणून प्रमुख कार्यालय आहे. पण उमेदवारांची घोषणा झाली त्या प्रसिद्धीपत्रकात ठाण्याच्या आनंदआश्रमाचा पत्ता आहे. ही दिवसांपूर्वी श्रीकांत शिंदे हे नाशिकमध्ये गेले होते.

# अट्टल महाविद्यालयात भारत सरकारचा स्वच्छता आणि मतदार जागृती उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई/ बाळु तोडेकर**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शहिद दिनानिमित्त ‘स्वच्छता अभियान आणि मतदार जनजागृती कार्यक्रम’ आयोजित करण्यात आला आहे. भारत सरकार युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय तथा राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय निदेशालय, पुणे आणि संचालक, राष्ट्रीय



सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शहिद दिनानिमित्त मतदार जनजागृती आणि स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे या उपस्थित होत्या. डॉ. प्रवीण सोनुने यांनी विषय तज्ञ म्हणून विद्यार्थ्यांना मतदार जनजागृतीवर अनमोल मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना मतदार म्हणून शपथ दिली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण जाधव, प्रा. शरद सदाफुले, ग्रंथपाल डॉ. रणजीत पागोरे यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संचालक डॉ. सोनाली क्षीरसागर आणि कार्यालयीन कर्मचारी श्याम बंसवाल यांचे सहकार्य लाभले.

# पावनधाम प्रकरणी ५० मराठा आंदोलांकवर पोलिसात गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**

केज तालुक्यातील औरंगपुर येथे असलेल्या पावनधाम येथे तुकाराम बीज निमित्त दर्शनासाठी आलेल्या भाजपाच्या लोकसभा निवडणुकीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मराठा आरक्षण समर्थक आंदोलकांनी काळे झेंडे दाखवून घोषणाबाजी करून त्यांचा ताफा अडविल्या प्रकरणी सुमारे ५० ते ५५ जणांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.



या बाबतची माहिती अशी की, दि. २७ मार्च रोजी दुपारी १:३० वा. च्या सुमारास भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अंबाजोगाई-कळंब रोडवर असलेल्या औरंगपूर येथील पावनधाम येथे तुकारामबिज निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमासाठी आल्या होत्या. त्यांनी संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतल्या नंतर त्या शेजारच्या सभा मंडपात मठाधिपती ह.भ.प. महादेव महाराज बोराडे यांचे सूरु असलेले कीर्तन ऐकण्यासाठी जात असताना मराठा आरक्षण समर्थक जमावातील कार्यकर्त्यानी त्यांना काळे झेंडे दाखवून एक मराठा लाख मराठा आशा घोषणा दिल्या. त्यामुळे तेथे काही काळ गोंधळाची व तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याने पोलिसांनी घोषणाबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर सौम्य लाठीमार केला होता.

त्या प्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गोपनीय शाखेचे पोलीस शिपाई योगेश समुद्रे यांच्या फिर्यादी वरून ५० ते ५५ जणांच्या जमावांनी मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्या महाराष्ट्र पोलिस कायदा जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन करून पंकजा मुंडे यांचे गाडीचे समोर येऊन त्यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीचे संदर्भाने एक मराठा; लाख मराठा. आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाच ! अशा घोषणा दिल्या. जमावाने जिल्हा दंडाधिकारी यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लघंन केले म्हणुन त्यांच्या विरुध्द गु र नं ७२/२०२४ भा दं वि ३४१, ३४३, १४७, १४९, १८८ महाराष्ट्र पोलीस कायदा १३५ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार रामधन डोईफोडे हे तपास करीत आहेत.

# सेवातीर्थच्या निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य आणि ब्लँकेटचे वाटप

## स्वराज बहुउद्देशीय संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**वादळवार्ता/शिरूर कासा**

निराधार आणि निराश्रीत मुलांचा सांभाळ करणाऱ्या मातोरी येथील सेवातीर्थ सामाजिक प्रकल्पात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना गुरुवारी शैक्षणिक साहित्य आणि ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. स्वराज बहुउद्देशीय संस्था,बीडच्या वतीने या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी पत्रकार गोकुळ पवार यांच्यासह भरत पानसंबळ,सामाजिक कार्यकर्ते तथा सर्पमित्र महेश औसरमल आणि सेवातीर्थचे संस्थापक सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून




आपणही समाजाचे काही तरी देणे लागतोत या अनुषंगाने बीड येथील स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विधवा महिलांना साडीचोळी वाटप,गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्यासह आणि ब्लँकेटचे वाटप करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.त्याचाच एक भाग म्हणून गुरुवारी सेवातीर्थ येथील गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्यासह ब्लँकेट वाटप करण्यात आले.

# गेवराई येथील स्ट्राँग रुमची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

**वादळवार्ता/गेवराई**

गेवराई येथील स्ट्राँग रूमची जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी बुधवारी दौऱ्या दरम्यान पाहणी केली तसेच आढावा बैठक घेतली. गेवराई तालुक्यातील गढी येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे निवडणुकीच्या अनुषंगाने स्ट्राँग रूम तयार केली असून याची पाहणी जिल्हाधिकारी यांनी केली. यावेळी तालुक्यातील प्रत्येक विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी पाणीटंचाई विषयी आढावा बैठक घेतली तसेच येथील गोविंदवाडी साठवण तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली.




# केज तालुक्यात आढळला अनोळखी मृतदेह पोलिसांचे ओळख पटविण्याचे आवाहन



**वादळवार्ता/केज**

केज तालुक्यातील शिंदी ते विडा जाणाऱ्या रोडच्या कडेला रक पुरुष जातीचा अनोळखी मृतदेह आढळून आला असून केज पोलिसांनी त्याची ओळख ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे. या बाबतची माहिती अशी की, दि. २८ मार्च रोजी पिंपळगाव ता. केज येथील सरपंच सचिन गायकवाड यांनी फोन करुनकेज पोलिसांना कळविले की, पिंपळगाव ते विडा रोडवर अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह पडलेला आहे, माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस नाईक महादेव बहिरवाळ हे सदर ठिकाणी गेले. त्यांनी पाहिले असता पिंपळगाव ता. केज जि. बीड शिवारामध्ये पिंपळगाव ते विडा जाणाऱ्या दक्षिण-उत्तर रस्त्यावर रस्त्याच्या पश्चिम बाजुस रोडवर एक पुरष जातीचे अनोळखी प्रेत मिळुन आले. सदर प्रेताच्या डोक्याचा मेंदु बाहेर पडलेला दिसत होता. सदरची घटना ही अपघाताने झाली असावी असे निदर्शनास येत आहे. सदर मृतदेह उपजिल्हा रुग्नालय, केज येथे शवागृहात ठेवण्यात आलेला आहे. सदर मृतदेहाचे वर्णन रंग गव्हाळा, उंची ५ फूट २ इंच,चेहरा गोलसर, बांधा मजबुत अंगात पांढऱ्या रंगाचा छोटे चौकोनी काळ्या रंगाचे टच बटन असलेला शर्ट, लाल रंगाची स्पोर्ट बनियान, राखाडी रंगाची कॉटनची पॅन्ट, इंटकरी रंगाची अंडरवेअर, गळ्यामध्ये काळ्या रंगाचा दोरा, उजव्या हातामध्ये पिवळ्या रंगाचे जाडसर कडे आहे. या बाबत कुणाला माहिती असल्यास त्यांनी पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे मोबाईल नंबर ८८८८८४७३४५ अथवा पोलीस स्टेशन केज फोन नंबर ०२४४५२९५१०० वर संपर्क साधण्याचे पोलिसांनी आवाहन केले आहे.

# ग्रामीण भागातील मुले प्रचंड ऊर्जेचे स्रोत - डॉ.कैलास दौंड

## दहिफळे वस्ती येथे आठवीतील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

**वादळवार्ता/शिरूर कासार**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिफळेवस्ती केंद्र मानूर तालुका शिरूर कासार जिल्हा बीड येथे दि.२८ रोजी आठवी वर्गातील मुलांना निरोप समारंभ संपन्न झाला. डॉ.कैलास दौंड (८ वी बालभारती समाविष्ट गोधडी कवितेचे कवी) सुप्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात शिरूर कासार तालुक्यात द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिफळेवस्ती शाळेने मिळवल्याबद्दल कौतुक करण्यात आले. आठवी वर्गाला निरोप देताना शाळेतील वातावरण भावनिक झाले. मुलांनी शाळेने दिलेले विविध अनुभव, गुरुजनाप्रती असलेले भाव व्यक्त करत आठवणींना उजाळा देत मागील आठवणी ताज्या केल्या. मनात जिद्द ठेवत प्रयत्नाची पराकाष्ठा करा यश निश्चित मिळेल. व्यसनाला दूर ठेवा. नववी ते बारावी या टप्प्यात खूप अभ्यास करा व अंतिम ध्येय मिळवा असे विचार शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या. हा सोहळा सुख, दुःख मिश्रित असतो, मुलांनो कष्टाशिवाय यश मिळत नाही. नेहमी कष्ट करा. जीवनात संस्काराला महत्व द्या असे विचार बालसाहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव यांनी व्यक्त करत आपल्या बाल कवितांनी मुलांची मने जिंकली. त्यांच्या ‘उंदरीन सुंदरीन’ आणि ‘अटर का पटर’ या कवितांनी मुलांमध्ये अक्षरशः धमाल उडवून दिली. मुलांच्या भाषेत साभिनय सादरीकरणाने कवितेला अप्रतिम दाद मिळाली. क्षणाचा सहवास जीवनभर टिकू शकतो. आई वडिलांची वेदना, कष्ट समजले




की यश मिळवण्याचा मार्ग सोपा होतो. तुम्ही सर्वजण ग्रामीण भागातील आहात आणि ग्रामीण मुलामध्ये प्रचंड ऊर्जा असते. कोणत्याही ऋतूत व कोणत्याही समस्येवर ग्रामीण मुले मात करतात. लेकरांनो, आपल्या आई वडिलांचा हात कधीतरी हातात घ्या तो किती खरबुड आहे? किती झिजला? हे समजून घ्या आणि भविष्यात त्या झिजलेल्या हातांचे आधार बना असे विचार व्यक्त करत डॉ.कैलास दौंड यांनी माझे रान या कवितेने भाषणाचा समारोप करत सर्वांची मने जिंकली. शिवांजली मानूरकर व आराध्या गीते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर मुख्याध्यापक ताजुद्दिन शेख यांनी आभार मानले. दीपक देठे, संतोष गर्जे सर, अंकुश खेडकर, दत्तू शिरसाट, शीतल काळदाते मॅडम यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त केले अभिवादन

**दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी**

पुणे : हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार जयंतीनिमित्त आज सर्वत्र जन्मोत्सव साजरा केला जात आहे. यानिमित्त उच्च व तंत्र मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या कोथरूडमधील शिवस्मारक येथे शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी मुरलीधर मोहोळ देखील उपस्थित होते. तिथीनुसार आज सर्वत्र शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव साजरी केला जात आहे. चंद्रकांत पाटील यांनी प्रथम आपल्या कोथरूडमधील निवासस्थानी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर कोथरूडमधील शिवस्मारक



येथे शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि.तुषार पट्टेकर यांनी केले तर आभार प्रा. मंदा मस्के यांनी मानले. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमांतर्गत संस्कृती विद्यालय तालुक्यात द्वितीय



**वादळवार्ता/बीड**

बीड शहरापासून जवळच असलेल्या अतिशय निसर्गरम्य परिसरात असलेल्या शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालय म्हसोबा फाटा नगर रोड, बीड या शाळेला खाजगी व्यवस्थापन मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमांतर्गत तालुकास्तरीय द्वितीय क्रमांक मिळाला आहे . ही शाळा मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवून शारीरिक, मानसिक, बौद्धिक , सामाजिक, व अध्यात्मिक उपक्रमावर भर देते. यामध्ये वर्ग सजावट, शाळा सजावट, वृक्षारोपण, संरक्षण भिंतीची रंगरंगोटी, बोलक्या भिंती तसेच शाळेत विद्यार्थी मंत्रिमंडळ बालसंसद आहे. शाळेत परसबाग आहे. आरोग्यदायी वृक्षांची लागवड शाळेच्या परिसरात केलेली आहे . ‘मेरा देश, मेरी मिठ्ठी ‘ याही उपक्रमाचे आयोजन या ठिकाणी करण्यात आले आहे . शाळेच्या उपस्थितीचे प्रमाण शंभर टक्यावर आहे. महावाचन चळवळीमध्ये मुलांनी सहभाग घेतला आहे . विविध प्रकारच्या स्पर्धात मुलांचा सहभाग असतो. शालेय परिसरात जनजागृतीचे फलक लावण्यात आले आहेत . वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे पंचसूत्री पद्धतीने एक धडा पाच वेळेस शिकवला जातो . शाळेत मनोरंजनासाठी कारंजे, पशुपक्षालय आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांचा शाळांमधील शिक्षक , पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळाप्रती उत्तरदायीत्वाची भावना निर्माण निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे. यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आदर्श शाळा योजनेअंतर्गत ‘ मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा ‘ हे अभियान राबविण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा यांच्यासाठी व इतर सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना स्वतंत्रपणे परितोषीकांची तरतुद करण्यात आली आहे. तालुकास्तरीय , जिल्हास्तरीय , विभागास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. राज्याच्या शिक्षण विभागाने केंद्रातून तालुका , जिल्हा आणि राज्यस्तरावर ‘ ‘ सुंदर शाळेची ‘ स्पर्धा आयोजित केली होती. या शाळेचा परिसर मोठा असल्याने येथे विविध उपक्रम राबविणे शिक्षक व विद्यार्थ्यांना शक्य होते. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावल्याने संस्कृती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री दत्ता नलावडे यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

## पुणे शहरात धुलीवंदन उत्साहात संपन्न...



दैनिक वादळ वार्तापुणे/पंकज भंडारीपुणे शहर आणि परिसरात धुलीवंदन सण उत्साहात साजरे करण्यात आले. यावर्षी लहान मुलांची सहभागाने उत्सवात मोठीच रंगत आली होती. सोमवारी सकाळी नऊ वाजल्यापासून लहान मुले हातात रंग घेऊन धुलीवंदन उत्साहात साजरा करीत होती. शाळांना सुट्ट्या असल्याने मुलांमध्ये मोठा उत्साह होता. दरवर्षीप्रमाणे लहान मुलांचा काल पारंपरिक रंगानऐवजी नैसर्गिक रंगाकडे होता. आणि कोरड्या रंगाच्या यावेळी मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला.

# शिंदेंच्या पहिल्या यादीमध्ये श्रीकांत शिंदेंचं नाव नाही, गोविंदाच्या तिकीटाच्या चर्चाही हवेत

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

लोकसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये आठ जागांवरील उमेदलवारांच्या नावाची घोषणा केली आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांचे नाव पहिल्या यादीमध्ये नाही. श्रीकांत शिंदे यांचं नाव पहिल्या यादीमध्ये नसल्याने याची राजकीय वर्तुळात चर्चा होताना दिसत आहे. श्रीकांत शिंदेंसह आणखी काही अशा जागा आहेत जिथे अद्याप उमेदवारांची घोषणा केली गेली नाही. पहिल्या यादीमध्ये नाशिक, कल्याण-डोंबिवली आणि यवतमाळ-वाशिम या जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले नाहीत. या जागांवरचा तिढा कायम असल्याचं दिसत आहे त्यामुळे या जागांवर उमेदवाराची घोषणा केली गेली नसावी. तर मावळमधून श्रीरंग बारणे यांना परत एकदा उमेदवारी देण्यात आली आहे.

या आठ जागांवर शिंदेंच्या शिवसेनेकडून उमेदवारी जाहीर मावळमधून श्रीरंग बारणे, रामटेकमधून राजू पारवे, हातकणंगलेमधून धैर्यशील माने, कोल्हापूरमधून संजय मंडलिक, हिंगोलीतून हेमंत पाटील, बुलडाणातून प्रतापराव जाधव, शिर्डीत सदाशिव लोखंडे, दक्षिण मुंबईतून राहुल शेवाळे यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. या यादीमध्ये पहिल्या यादीमधील आठ जागांवरील सात जागांवर विद्यमान खासदारांना उमेदवारी देण्यात आली आहेय तर





राहुल शेवाळे यांना दक्षिण मुंबईतून संधी मिळाली आहे.

### गोविंदाच्या उमेदवारीची चर्चा हवेतच

बॉलिवूडचा प्रसिद्ध अभिनेता गोविंदा याने दुपारी शिंदेंच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे गोविंदालाही तिकीट मिळणार असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र पहिल्या यादीमध्ये त्याच्या नावाचा समावेश नसल्याने ती चर्चा हवेतच विरल्याचं दिसत आहे. उत्तर-पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून त्याला संधी देणार असल्याची चर्चा होत आहे.

## शेतक-यांचे पशुधन वाचविण्यासाठी चारा छावण्या,चारा डेपो सुरु करा - अशोक हिंगे

**वादळवार्ता/बीड**

गेल्या दोन वर्षांत पावसाचे प्रमाण अल्प झाल्याने दुष्काळ ग्रस्त परिस्थिती जिल्ह्यात निर्माण झाली आहे. पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाली आहे.जनावरांच्या चाराचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर होऊनही दुष्काळातील कुठल्याही सुविधा देण्यात आल्या नाहीत. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई आहे परंतु अजुनही टॅंकरची व्यवस्था करण्यात आली नाही. चारा दुसऱ्या जिल्ह्यात तुन मागवणे,खरेदी करणे हे शेतकऱ्यांना



परवडणारे नाही. या शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सत्ताधारी मंडळींना वेळ नाही. लोकसभा निवडणुकीच्या तयारीत ते मशगुल आहेत. शेतकऱ्यांनी आपले पशुधन कवडी




मोल किंमतीत विकायला सुरुवात केली आहे.याचा परिणाम येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचया जिवनावर झाल्या शिवाय रहाणार नाही. म्हणुन शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी शासनाच्या वतिने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरु करून शेतक-यांना दावणीला चारा व पाण्याची व्यवस्था करावी अन्यथा लवकरच शेतक-यांचा जनावरासहीत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी दिला आहे.

## मोटर सायकलची समोरासमोर धडक ; दोन ठार, एक जखमी अंबाजोगाई तालुक्यातील सातेफळ फाट्यावर झाला अपघात

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई तालुक्यातील अंबा साखर कारखाना ते देवळा रोडवरील सातेफळ फाट्या नजिक मोटरसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाल्याची घटना दि.२७ मार्च बुधवार रोजी सायंकाळी उशिरा घडली आहे. या अपघातात दोन जण ठार तर एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. सुशांत सुनील ठाकूर (वय २३) रा. पाटोदा (म.) ता. अंबाजोगाई व बालाजी भुजबळ (वय ३०) रा. जोडजवळा जि.लातूर असे अपघातात



मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. तर शिवहर भुजबळ हे गंभीर जखमी झाले आहेत. अंबासाखर कारखाना ते देवळा रोडवर असलेल्या सातेफळ फाट्यांना जवळ मोटरसायकल क्रमांक एम एच ११ - सी यु -२७५८ आणि एम एच २४ - बी एस-९१८३ समोरासमोर अपघात झाला. अपघात इतका भयान होता की दोन्ही मोटरसायकलचा हेडलाईटच्या भागाचे अक्षरशा तुकडे तुकडे झाले आहे. सातेफळ येथिल नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत, अपघातातील जखमींना अंबाजोगाई येथिल स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान अपघातातील दोघे मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घटनास्थळी दाखल होत घटनेचा पंचनामा केला आहे. सुशांत ठाकूर हा त्याच्या मोटार सायकलवर बसून, अंबाजोगाई कडे येत होता. याच दरम्यान बालाजी भुजबळ व शिवर भुजबळ हे अंबाजोगाईहून त्याच्या जोडजवळा या गावी जात असताना सातेफळ फाट्यावर समोरासमोर हा अपघात झाला असल्याचे सांगण्यात आले.

## नायगांव येथे अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगांव/हानुमंत चंदनकर**

नायगाव शहरातील हनुमान मंदिर गांधीनगर येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वसुंधरारत्न राष्ट्रसंत सद्गुरु डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या प्रेरणेने अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन दिनांक २७/०३/२०२४ ते दिनांक ०३/०४/२०२४ रोज बुधवार पर्यंत आयोजित करण्यात आला आहे शिवनाम सप्ताह तील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ६ शिव पाठ ७ ते ८ मारुती अभिषेक ९ ते ११ सामुहिक पारायण सोहळा ११ ते १२ प्रवचन व आर्ती १२ ते २ प्रसाद विश्रांती ३ ते द गाथा भजन ५ ते ६ शिवपाठ रात्री ८ ते १० शिवकिर्तन शिवनाम सप्ताह तील शिवाचार्याचे आशीर्वचन व शिव कीर्तन दिनांक २७ मार्च २०२४ सद्गुरू १०८ संगण बसव शिवाचार्य महाराज निलंगा रात्री कीर्तन त्रंबक स्वामी नंदगावकर दिनांक २८ मार्च सद्गुरु १०८ राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपूरकर रात्री शिवकिर्तन



कावडे गुरुजी हसनाळीकर दिनांक २९ मार्च सद्गुरु वीरभद्रेश्वर महाराज येल्लूरकर रात्री शि भ प स्वातीताई दापकेकर, ३० मार्च शि भ प विठ्ठलराव ताकबिडेसर अक्कामहादेवी या विषयावर व्याख्यान रात्री विश्वनाथ स्वामी वडवळकर,३१ मार्च सद्गुरु १०८ डॉक्टर सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर रात्री शिवभ मनमथ आप्पा डांगे गुरुजी उस्मान नगरकर १ एप्रिल सद्गुरु १०८ वीरूपक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, रात्री शिभ प भाग्यश्री पाटील शेरे दवन हिप्परगा, २ एप्रिल सद्गुरु १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर रात्री शी भ प शिवानंद महाराज हैबतपुरे, ३ एप्रिल सद्गुरु १०८ वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमत थोरला मठ महाप्रसादावरील कीर्तन सकाळी ९ ते ११ पर्यंत व भव्य महाप्रसाद व्यासपीठ प्रमुख शिवलिंग पाटील ताराबाई बोमनाळे पारायण प्रमुख शोभाताई भोस्कर गोकुळ बाई अमलापुरे टाळ आरती व किर्तन दिनांक ०२/ ०४ /२०२४ रोज मंगळवारी दुपारी २ ते ४ ह भ प बाल कीर्तनकार शिवानी रामदास वसमते लोहगावकर यांचे आयोजन केले आहे तरी परिसरातील भाविकांनी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन समस्त सद्भक्त मंडळी नायगांव बाजार यांच्या वतीने करण्यात आले आहे

# मी जमीनदेखील द्यायला तयार, पंकजा मुंडे यांचं मोठं वक्तव्य

**वादळवार्ता/बीड**

भाजपच्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी आज अंबाजोगाईच्या दौऱ्यादरम्यान मोठी घोषणा केली आहे. “बीड जिल्हा असा आहे तसा आहे मी ही ओळख पुसून टाकणार. हिंगोली जिल्ह्यामध्ये 10 हजार लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. मी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्यावतीने जमीन देखील द्यायला तयार आहे. जिल्ह्यामध्ये एखादं मोठं चांगलं मेडिकल कॉलेज हवं, असं माझं स्वप्न आहे”, असं मोठं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केलं आहे. पंकजा मुंडे यांचा बीड जिल्ह्यात सर्वत्र झंझावात दौरा सुरू आहे. त्यांनी आज अंबाजोगाई शहरातील प्रमुख लोकांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांनी व्यापारी संघटनेच्या लोकांची भेट घेतली. यावेळी व्यापारी संघटनेच्या लोकांनी पंकजा मुंडें यांना म्हटलं की, आपले वडील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी अंबाजोगाईसाठी खूप काही दिलं आहे. म्हणून आपण लोकसभा निवडणुकीसाठी उभे आहोत. मात्र आपण आजच अर्धी लढाई जिंकली आहे, असं देखील ते म्हणाले. यावेळी उपस्थितांना संवाद साधताना पंकजा मुंडें म्हणाल्या की, “आत्तापर्यंतच्या राजकारणात मुंडे साहेबांना कितीही कठीण प्रसंग आला तरी आपण मुंडे साहेबांना आपण निवडून देण्याचे काम आपण केले आहे. राजकारणात क्षणोक्षणी बदल घडत आहेत. डायनॉमिक राजकारण होत आहे. कोण कधी कोणासोबत येणार हे अचानकपणे समोर येत आहे.” तसेच “माझी उमेदवारी भारतीय जनता पक्षाने ठरवली आहे. माझे वडील गोपीनाथ मुंडे यांच्या अचानक जाण्याने असं काय बदल झाले की त्यांची जागा मला घ्यावी लागली? आता राजकारणामध्ये इतके बदल होत आहेत की रोज कळत नाही. गोपीनाथ मुंडे देखील 85 साली हारले होते. विलासराव देशमुख देखील हारले होते. देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी देखील हरल्या होत्या”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.



### ‘आता भांडायची गरज नाही’

“योगायोग राष्ट्रवादी आता आमच्यासोबत आली आहे. आता भांडायची गरज नाही. मी धनंजय मुंडेंना बोलले, तुम्ही तुमच्या कार्यकर्त्यांनी बोला. मी माझ्या कार्यकर्त्यांना बोलेन. मोदींनी जी यादी दिली त्यामध्ये माझं नाव आहे. त्यामुळे मला महाराष्ट्रमध्ये फिरावे लागेल”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.“मी पालकमंत्री असताना प्रीतम ताई यांनी त्या कामाचे उद्घाटन केली आहेत. मी आपल्याला खूप काही भरभरून दिले आहे. बीड जिल्ह्यासाठी रेल्वे येणे शक्य नव्हते. मात्र मुंडे साहेबांमुळेच आम्ही ही रेल्वे आणू शकलो. बीड जिल्ह्याला 10 हजार कोटींचे राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्याला वेडा घालणारे आणले. सरकार बदलले. अजित पवार यांचे सरकार आले आणि या काळात माझा भाऊ धनंजय मुंडे या जिल्ह्याचा पालकमंत्री झाला. अन् त्यानेही बीड जिल्ह्याची कामे केली”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.“माझा प्रत्येक क्षण मी जिल्ह्याच्या विकासासाठी द्यावा अशी माझी इच्छा आहे. तर जिल्ह्यातील 10 हजार युवकांना रोजगार देण्यासाठी उद्योग आणण्याची माझी इच्छा आहे. मी ज्या ही गावात जात आहे त्या गावातून मला लोक सांगत आहेत की ताई तुम्ही आमच्यासाठी हे आणले इतके दिले आहे म्हणून माझा विश्वास दृढ होत आहे. माझ्या विरोधातील लोकांनाही मी त्रास देत नाही. माझ्यावर फिरूनफिरून एकच आरोप होतो की मी फोन उचलू शकत नाही. कारण दिवसातील 18 तास मी काम करत आहे”, असंही पंकजा मुंडे बोलताना म्हणाल्या.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )